महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं. १५६०/१ आडगांव शिवार, न्यु इंग्लिश स्कुल जवळ, मुंबई आग्रा रोड, नाशिक – ४२२ ००३

**Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,**
**Nashik Divisional Board, Nashik**
Gat/Sr.No .1560/1 Adgaon Shivar, New English School, Mumbai-Agra Road, Nashik – 422003

Website - sscboardnashik.com   Email - nsksec@rediffmail.com   कार्यालय दुरध्वनी : ०२५३–२९४५२४१, २९४५२५१

<u>अत्यंत महत्त्वाचे</u>
<u>कालमर्यादित</u>

क्र.नाविमं/लेखा/दुष्काळ ख. हं./3533
नाशिक – ४२२ ००३
दिनांक :– २०/०२/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार जिल्हे

विषय :– सन २०२३–२४ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य दुष्काळसदृश्य भागातील इ.१०वी व इ.१२वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरीता उर्वरीत विद्यार्थ्यांचे बॅक खाते वअनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी अंतिम संधी म्हणून दि.१८/०२/२०२५ ते दि.२८/०२/२०२५ या कालावधीत ऑनलाईन पोर्टल उपलब्ध असल्याबाबत...

संदर्भ :– १. शासन निर्णय क्र.एससीवाय–२०२३/प्र.क्र.३७/म–७, दि.३१/१०/२०२३ चे पत्र.
२. शासन निर्णय क्र.एससीवाय–२०२३/प्र.क्र.३७/म–७, दि.१०/११/२०२३ चे पत्र.
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी–५, दि.०१/०८/२०१९ व दि.०३/०२/२०२० चे शुध्दीपत्रक.
४. क्र.रा.मं/सन २०२३ दुष्काळ ख.हं./४३९, दि. ३१/०१/२०२५ चे पत्र.
५. या कार्यालयाचे क्र.नाविमं/लेखा/दुष्काळ ख.हं./३११७, दि.३१/०१/२०२५ चे पत्र.
६. या कार्यालयाचे क्र.नाविमं/लेखा/दुष्काळ ख.हं./३२०७, दि.०७/०२/२०२५ चे पत्र
७. क्र.रा.मं/सन २०२३ दुष्काळ ख.हं./७०५, दि. १८/०२/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ व शुध्दीपत्रक दि.०३/०२/२०२० अनुसार सन २०२३–२४ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरीता ऑनलाईन पोर्टलव्दारे एकूण ५,९९,०६४ विद्यार्थ्यांची नोंदणी संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून करण्यात आलेली होती. दि.२८ मार्च, २०२४ ते दि.१३ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत नोंदणी झाल्यापैकी ३,४०,१६५ पात्र विद्यार्थी/पालकांच्या आधार संलग्न बॅक खात्यात शासन निर्णयानुसार परीक्षा फी प्रतिपूर्तीची रक्कम रु.१६,६३,५८,४६०/– वर्ग करण्यात आलेली आहे.

सन २०२३–२४ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांना इ.१०वी व इ.१२वी च्या परीक्षा शुल्क परतावा तांत्रिक अडचणीमुळे मिळू शकला नाही. तांत्रिक अडचणीमुळे पात्र विद्यार्थी फी परताव्याच्या लाभापासून वंचित राहू नये म्हणून उर्वरीत २,५८,८९९ विद्यार्थ्यांचे बॅक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल दि.०३ फेब्रुवारी ते दि.१४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत राज्य मंडळ कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिल्याबाबत संदर्भाधिन पत्र क्रमांक ५ व ६ अन्वये कळविण्यात आले होते. निर्धारीत मुदतीत इ.१०वी चे ६,९५३ व इ.१२वी चे ३,१४० विद्यार्थ्यांचे बॅक खाते तपशील व इतर अनुषंगिक माहिती संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन पोर्टलवर भरलेली आहे.

तथापि, इ.१०वी चे १,५५,७८७ विद्यार्थी तसेच इ.१२वीचे ९३,०१९ विद्यार्थ्यांना अद्याप परीक्षा फी परतावा देणे बाकी आहेत. शासनाकडून उपलब्ध झालेल्या निधीचा विनीयोग आर्थिक वर्ष २०२४–२५

संपण्यापूर्वी दि.३१ मार्च २०२५ अखेर होणे आवश्यक असल्याने तसेच एकही पात्र विद्यार्थी फी परतावा योजनेपासून वंचित राहू नये यासाठी पुन:श्च एकदा अंतिमः संधी राज्य मंडळाकडून देण्यात येत आहे. परीक्षा फी प्रतिपूर्ती करण्याकरीता पात्र विद्यार्थ्याचे आधार लिंक असलेले बॅक खाते तपशील, विद्यार्थ्याचे आधारकार्ड इ. माहिती दुरुस्त/सुधारित करण्याकरीता इ.१०वी **http://feerefund.mh-ssc.ac.in** आणि इ.१२वी करीता **http://feerefund.mh-hsc.ac.in** या ऑनलाईन लिंकवर दि.१८/०२/२०२५ ते दि.२८/०२/२०२५ या कालावधीत भरण्याची कार्यवाही गांर्भियनि पूर्ण करावी.

तसेच परीक्षा शुल्काचा परतावा मिळणेस पात्र असलेला कोणताही विद्यार्थी सदर लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी आणि परीक्षा शुल्क परतावा मिळणेस पात्र असलेला विद्यार्थी सदर लाभापासून वंचित राहिल्यास यास मुख्याध्यापक जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

(एम. एस. देसले)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३

**प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव —**

१. शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक
२. शिक्षणाधिकारी (माध्य.), नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार